<u>प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, कोर्ट ६ वे, लातूर यांच्या न्यायालयात</u>

**सं.फौ.ख.क्र. २०९१/२०२६**
**नि.क्र.०१**

१) गुन्हा घडल्याची तारीख : २४.०५.२०२६.

२) गुन्हा दाखल झाल्याची तारीख : ०७.०७.२०२६

३) तक्रारदाराचे नाव : **महाराष्ट्र सरकार**
मार्फत गातेगाव.पो.स्टे,
लातूर.

४) आरोपीचे नाव व पत्ता : **सचिन अंकुश मेटे,**
**वय–**२५वर्षे,**व्यवसायः** पानशॉप,
**रा.** मुरुड अकोला,
ता. जि. लातूर.

**५) घटनेचा तपशील :**

तुम्ही दिनांक २४.०५.२०२६ रोजी २१.०० वाजताच्या सुमारास मौजे मुरुड अकोला चौकामध्ये, ता. जि. लातूर येथील अमृतुल्य पानस्टॉल मध्ये १८ वर्ष वयाखालील युवकांना महाराष्ट्र शासनाने विक्रीस बंदी घातलेल्या तंबाखुजन्य पदार्थ सिगारेट, गायछाप विक्री करताना मिळून आलात त्यामुळे तुम्ही सिगारेट व इतर तंबाखुजन्य उत्पादने (जाहीरात प्रतिबंध आणि व्यापार व वाणिज्य व्यवहार आणि उत्पादन पुरवठा व वितरण यांचे विनयमन) अधिनियम २००३, कलम ६ (अ) २४ प्रमाणे गुन्हा केलात.

(श्रीमती एस. एस. पाटील)
दिनांकः ०७.०७.२०२६ प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,
(न्यायालय क्र.६), लातूर.

प्र १ ल: तुम्हाला पोलीसांनी दिलेले कागदपत्र मिळाले काय?
उत्तर : होय.

प्र २ रा: तुम्हाला आता जो आरोप मराठीत वाचून दाखविला व समजावून सांगितला तो तुम्हाला समजला काय?
उत्तर : होय.

प्र ३ रा: तुम्हाला गुन्हा कबुल आहे काय?
उत्तर : मला गुन्हा कबूल आहे.

..................
**आरोपीची सही**

(श्रीमती एस. एस. पाटील)
दिनांक: ०७.०७.२०२६ प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,
(न्यायालय क्र.६), लातूर.

**<u>न्यायनिर्णय</u>**

आरोपीने स्वच्छेने गुन्हा कबूल केला आहे. मी आरोपीला सदर गुन्हयास असलेली शिक्षेची तरतूद समजावून सांगितली. तरी आरोपीने गुन्हा मान्य केला. आरोपीने दया दाखविण्याची विनंती केली आहे. आरोपी वरील असलेला आरोप आणि गुन्हयाचे स्वरूप पाहता मी खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

<u>**आदेश**</u>

आरोपीस सिगारेट व इतर तंबाखुजन्य उत्पादने (जाहीरात प्रतिबंध आणि व्यापार व वाणिज्य व्यवहार आणि उत्पादन पुरवठा व वितरण यांचे विनयमन) अधिनियम २००३, कलम ६ (अ) २४ अन्वये दोषी ठरविण्यात येते आणि आरोपीला शिक्षेसाठी **रू.२००/—** दंड आकारण्यात येतो. आरोपीने दंड भरण्यास कसूर केला तर त्याने त्यासाठी दोन दिवस साधा कारावास भोगावा.

Digitally signed by SWAPNALI SUJIT PATIL
Date: 2026.07.07 16:03:48 +0530

(श्रीमती एस. एस. पाटील)
दिनांक: ०७.०७.२०२६. प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,
(न्यायालय क्र.६), लातूर.